मुंबई महानगर प्रदेशात जागतिक दर्जाच्या सुविधा
देण्याच्या दृष्टीने पर्यावरण धोरण ठरविणे,
पर्यावरण अभियान राबविणेसाठी समितीचे गठन.

**महाराष्ट्र शासन**
पर्यावरण विभाग,
शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१०/प्र.क.१०१/तां.क.३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ३ ऑगस्ट, २०१०

**प्रस्तावना**

मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ नोव्हेंबर, २००९ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे आयोजित केलेल्या नागरी कृती मंचाच्या बैठकीमध्ये मुंबई महानगर क्षेत्र हा जागतिक दर्जाचा नागरी समूह म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून सुनियोजित अभियान राबवण्याविण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार पर्यावरण विभागामार्फत मुंबई महानगर क्षेत्रात पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी व या क्षेत्राच्या शाश्वत विकासासाठी "पर्यावरण अभियान" राबवावे असे ठरले. हे अभियान राबविण्याकरिता आवश्यकते नुसार सचिव पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली अभियान व संलग्न कार्यक्रमाची रुपरेषा व आराखडा निश्चित करण्यासाठी संबंधित यंत्रणेच्या प्रतिनिधींची व तज्ञाची समिती गठित करण्यात यावी असे मा. मुख्यमंत्री यांचे स्तरावरुन सूचित करण्यात आले असल्याने अशी समिती गठित करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :**

मुंबई महानगरप्रदेशातील शाश्वत विकासाबरोबरच पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी "पर्यावरण अभियान" निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.-

| | | |
|---|---|---|
| १) सचिव, पर्यावरण, महाराष्ट्र शासन | .. | अध्यक्ष |
| २) श्री. नरेंद्र नायर, चेअरमन, बॉम्बे फर्स्ट | .. | सदस्य |
| ३) प्रकल्प व्यवस्थापक, एम.टी.एस.यू. | .. | सदस्य |
| ४) अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,मुंबई महानगरपालिका (घनकचरा) | .. | सदस्य |
| ५) अतिरिक्त महानगर आयुक्त,एम.एम.आर.डी.ए. | .. | सदस्य |
| ६) श्री प्रसाद मोडक, संचालक, इ.एम.सी. | .. | सदस्य |
| ७) श्री. राकेश कुमार, शास्त्रज्ञ व विभागप्रमुख,नेरी | .. | सदस्य |
| ८) संचालक/शास्त्रज्ञ-१ पर्यावरण विभाग | .. | सदस्य सचिव |

**<u>उच्चस्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल.-</u>**

१. सदर समिती सिटीझन ॲक्शन ग्रुप तसेच इतर सर्व संबंधित विभागांशी व तज्ज्ञांशी सल्लामसलत करुन पर्यावरण जनजागृती, नागरी घनकचरा व्यवस्थापन, हवा प्रदुषण व्यवस्थापन, नागरी सांडपाणी व्यवस्थापन, वाहतून व्यवस्थापन, ध्वनी प्रदुषण, जल प्रदुषण इ. घटकांवर व्यवस्थापन व कृति आराखडा तयार करुन त्याच्या अंमलबजावणीसाठी शासनास सादर करेल. यासाठी सदरहू समिती मुंबई महानगर क्षेत्रासाठी पर्यावरण अभियान (Environmental Mission) विकसित करेल.

२. या पर्यावरण अभियानाच्या अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित तज्ञ, स्टेक होल्डर, शासकीय यंत्रणा यांचेसह पर्यावरण अभियानाची कार्यपध्दती ठरवेल.

३. पर्यावरण अभियानाशी सुसंगत विविध घटकांचा कृती आराखडा तयार करुन त्याच्या शाश्वत अंमलबजावणीसाठी शासनास शिफारस करेल.

४. सदर समिती उपरोक्तनुसार पर्यावरण अभियानाबाबत संबंधित कृती आराखडा तीन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करुन तो मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समिती (Empowered Committee) पुढे सादर करेल.

सदर शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्र. २०१००८०३१९०७२३००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार.

वल्सा नायर सिंह

**(वल्सा आर. नायर सिंह)**
**सचिव (पर्यावरण), महाराष्ट्र शासन**

प्रत

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५) मुख्य सचिव
६) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
७) गठित समितीचे संबंधित सदस्य
८) सर्व उप सचिव, पर्यावरण विभाग,
९) निवड नस्ती/तां.क.१